**<u>प्रेसनोट</u>** दि. २३/०७/२०२४

**सनसर मंडल अधिकारी कार्यालय, ता. इंदापूर, जि. पुणे येथील मंडल अधिकारी यांचेवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वालचंदनगर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | ज्ञानोबा विश्वंभर कावळे, वय ५५ वर्ष, पद - मंडल अधिकारी, सनसर मंडल अधिकारी कार्यालय, (अति.कार्य. लासुर्णे मंडल अधिकारी) ता. इंदापुर, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | २००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २००/- रुपये (दोनशे रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. २३/०७/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. २३/०७/२०२४ |

ठिकाण :- दिनांक २३/०७/२०२४ रोजी सनसर मंडल अधिकारी कार्यालय, ता. इंदापुर, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे आईचे नावे विभक्त शिधापत्रीका मागणीचा रितसर अर्ज गावकामगार तलाठी यांचेकडे सादर केला होता. सदर अर्जावर तलाठी यांनी शिधापत्रीका देण्यास हरकत नसल्याबाबतचा अहवाल मंडल अधिकारी लोकसेवक ज्ञानोबा कावळे यांचेकडे पाठविला होता. तक्रारदार यांची आई वयोवृद्ध असल्यामुळे आईच्या परवानगीने तक्रारदार हे मंडल अधिकारी लोकसेवक ज्ञानोबा कावळे यांना सदर कामासाठी भेटले असता, लोकसेवक ज्ञानोबा कावळे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या आईचे शिधापत्रीका देण्यास हरकत नसल्याबाबतचा अहवाल स्वाक्षरी करुन तहसिलदार कार्यालय, इंदापूर यांचेकडे पाठविण्यासाठी तक्रारदार यांचेकडे २००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. कडे केली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक ज्ञानोबा कावळे यांनी तक्रारदार यांचेकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती २००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक ज्ञानोबा कावळे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये २००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले म्हणुन त्यांचेविरुद्ध वालचंदनगर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक रुपेश जाधव तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.